# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.आयुक्त तथा प्रशासक
नगरसचिव कार्यालय

---

## प्रशासकीय महासभा क्रमांक २८

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सर्वसाधारण महासभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **मंगळवार दिनांक १९/११/२०२५ सकाळी १०-३० वाजता स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्री नितीन कापडणीस यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्री. नितीन कापडणीस | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती करुणा डहाळे | अति. आयुक्त |
| ३. | श्री किशोर सुडके | सहा. आयुक्त |
| ४. | श्री शाहेद शेख मो. शेख | मुख्य लेखापरीक्षक |
| ५. | श्री सुनिलकुमार सुर्यवंशी | उपमुख्यलेखापरीक्षक |
| ६. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ७. | श्री भटू पवार | प्र. सहा. संचालक नगररचना |
| ८. | श्रीमती संपदा कुलकर्णी | प्र. वैद्यकीय आरोग्यअधिकारी |
| ९. | श्री प्रदीप चव्हाण | कार्य.अभियंता |
| १०. | श्रीमती वर्षा घुगरी | कार्य. अभियंता स्थापत्य |
| ११. | श्री नवनित सोनवणे | कार्य. अभियंता पाणीपुरवठा |
| १२. | श्री.चंद्रकांत उगले | उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग |
| १३. | श्री. एन. के. बागुल | उपअभियंता, विद्युत विभाग |
| १४. | श्री चंद्रकांत मोरे | प्र.लेखापाल, लेखा विभाग |
| १५. | श्री.प्रकाश सोनवणे | उप अभियंता, नगररचना |
| १६. | श्री.कमलेश सोनवणे | सहा. अभियंता नगररचना |
| १७. | श्री.हेमंत पावटे | सहा. अभियंता बांधकाम |
| १८. | श्री.विश्वंभर दासरवाढ | प्रशासन अधिकारी, मनपा शिक्षण मंडळ |
| १९. | श्री मधुकर निकुंभे | अधिक्षक, वसुली विभाग |
| २०. | श्री काळु साबळे | लिपीक, आस्थापना |
| २१. | श्री.सुर्यकांत हजारे | प्र. बाजार विभाग प्रमुख |
| २२. | श्री. प्रसाद जाधव | अधिक्षक अतिक्रमण विभाग |
| २३. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| २४. | श्रीमती मिना सातभाई | समाज विकास अधिकारी |
| २५. | श्री राजेश वसावे | मुख्य स्वच्छता निरीक्षक |
| २६. | श्री.लक्ष्मण पाटील | मुख्य स्वच्छता निरीक्षक |
| २७. | श्री. गणेश खोंडे | प्रकल्प विभाग |

मा.नगरसचिव — वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

विषय क्रमांक:-२०९ मागील प्रशासकीय महासभा क्र.२२, २३, २४, २५, २६ व २७ चे इतिवृत्त वाचून कायम करणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २०९ दिनांक १९/११/२०२५**

मागील प्रशासकीय महासभा क्रमांक २२ दिनांक २०/०८/२०२५ च्या सभेतील धुळे मनपा प्रशासक ठराव क्रमांक १८० ते १८६ अखेर क्रमश:वाचून कायम करण्यांत येत आहे. तसेच मागील प्रशासकीय महासभा क्रमांक २३ दिनांक १२/०९/२०२५ च्या सभेतील धुळे मनपा प्रशासक ठराव क्रमांक १८७ ते १९२ अखेर क्रमश:वाचून कायम करण्यांत येत आहे. तसेच प्रशासकीय महासभा क्रमांक २४ दिनांक २९/०९/२०२५ च्या सभेतील धुळे मनपा प्रशासक ठराव क्रमांक १९३ ते १९७ अखेर वाचून कायम करण्यात येत आहे. तसेच प्रशासकीय महासभा क्रमांक २५ दिनांक १०/१०/२०२५ च्या सभेतील धुळे मनपा प्रशासक ठराव क्रमांक १९८ ते २०१ अखेर वाचून कायम करण्यात येत आहे. तसेच प्रशासकीय महासभा क्रमांक २६ दिनांक १७/१०/२०२५ च्या सभेतील धुळे मनपा प्रशासक ठराव क्रमांक २०२ अखेर वाचून कायम करण्यात येत आहे. तसेच प्रशासकीय महासभा क्रमांक २७ दिनांक ३१/१०/२०२५ च्या सभेतील धुळे मनपा प्रशासक ठराव क्रमांक २०३ ते २०८ अखेर वाचून कायम करण्यात येत आहे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-२१० मनोहर टाकी येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अर्धाकृती पुतळा वरखेडी येथील बहिरम बाबा चौक येथे उभारणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता मा. आमदार श्री. अनुप अग्रवाल यांनी दिलेल्या पत्रानुसार व मनोहर टॉकिज परिसरात स्थापित करण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराज अर्धाकृती पुतळा येथे सद्यस्थितीत नव्याने धुळे मनपामार्फत १८ फुट उंच श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा बसविणे व चौक सुशोभिकरण करणेचे काम सुरु आहे. त्यामुळे अर्धाकृती पुतळा वरखेडी येथे बहिराम बाबा चौक येथे शिफट करणेबाबत विषय मे. महासभेपुढे सादर झालेला आहे. याबाबत शासनाच्या सर्व परवानग्या सुध्दा घेण्यात आलेल्या आहेत.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २१० दिनांक १९/११/२०२५**

मनोहर टाकी परिसरात स्थापित करण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराज यांचा अर्धाकृती पुतळा येथे सद्यस्थितीत नव्याने धुळे मनपा मार्फत १८ फुट उंच श्रीछत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा बसविणे व चौक सुशोभिकरण करणेचे काम सुरु आहे.

त्यामुळे येथील पूर्वीचा अर्धाकृती पुतळ्याची योग्य देखभाल, सुरक्षितता व सार्वजनिक दर्शनाच्या सोयीसाठी, तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांच्या मागणीनुसार, तो अर्धाकृती पुतळा वरखेडी येथील बहिरम बाबा चौक येथे उभारणे आवश्यक आहे.

मनोहर टाकी येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अर्धाकृती पुतळा वरखेडी येथील बहिरम बाबा चौक येथे उभारणे हा विषय धोरणात्मक निर्णयाचा असल्याने सदरील विषयास मे.महासभेच्या मंजुरीची आवश्यकता आहे. तरी सदरचा विषय मे.महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त प्रस्ताव व अहवालानुसार, मनोहर टॉकीज येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अर्धाकृती पुतळा वरखेडी येथील बहिरम बाबा चौक मनपा मालकीच्या जागेत उभारण्यास मान्यता देणेत येत आहे.

याबाबत शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार आवश्यक ती परवानगी तथा मान्यता घेवुन कार्यवाही करावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-२११ धुळे मनपा हद्दीत अस्तित्वातील महाराणा प्रताप पुतळा, स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर, सुभाष पुतळा यांचे पूर्णाकृती पुतळा उभारणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता मा.आमदार श्री. अनुप अग्रवाल यांनी दिलेल्या पत्रानुसार अस्तित्वातील महाराणा यांचा पुतळा, स्वा. वि.दा. सावरकर पुतळा, व सुभाषचंद्र बोस यांचा पुतळा असे तिनही पुतळे पुर्णाकृती करणेबाबत कळविले आहे. तसेच सदर तिनही पुतळे बदलुन पुर्णाकृती पुतळा उभारणे तसेच चबुतऱ्याचे बांधकाम, नकाशे अंदाजपत्रक बनविणेकामी आर्किटेक्ट नेमणुक करणेकामी निर्णयास्तव सदरचा विषय मे. महासभेत सादर झालेला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदरचे काम विहीत पध्दतीनुसार करावे. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २११ दिनांक १९/११/२०२५**

धुळे शहरात अस्तित्वातील महाराणा प्रताप पुतळा, स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर, सुभाष पुतळा यांचे पूर्णाकृती पुतळा उभारणेस मिळणेबाबत कळविण्यात आले आहे.

उक्त पुतळ्यांच्या स्मारकाचे प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केली असता महाराणा प्रताप पुतळा व स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर पुतळा पूर्णाकृती पुतळा असून सुभाष पुतळा अर्धाकृती पुतळा आहे. सदर तिन्ही पुतळे पूर्णाकृती करणेसाठी अस्तित्वातील चबुतऱ्याचे बांधकाम नव्याने करणे तसेच शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी शर्तीनुसार प्रशासकिय स्तरावरुन अनेक विभागाच्या परवानगी व मे.महासभेची मंजुरीची ई. बाबीची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

महाराणा प्रताप पुतळा, स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर, सुभाष पुतळा हे तिन्ही पुतळे बदलून पूर्णाकृती पुतळा उभारणे तसेच चबुतऱ्याचे बांधकाम, नकाशे अंदाजपत्रक बनविणे कामी आर्किटेक्ट नेमणूक करणेची कार्यवाही करणेकामी प्रस्ताव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, धुळे मनपा हद्दीत अस्तित्वातील महाराणा प्रताप पुतळा, स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर, सुभाष पुतळा यांचे पूर्णाकृती पुतळा उभारणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच चबुतऱ्याचे बांधकाम, नकाशे अंदाजपत्रक बनविणे कामी शासकीय दरसुचीनुसार श्री आनंद खैरनार आर्किटेक्ट यांची नेमणूक करण्यास मान्यता देणेत येत आहे.

याबाबत शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार आवश्यक ती परवानगी तथा मान्यता घेवुन कार्यवाही करावी. व याकामी आवश्यक ती अंदाजपत्रकीय तरतुद करण्यात यावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-२१२ धुळे मनपा अंतर्गत धुळे शहरातील विविध मुख्य चौकांचे सुशोभिकरण करण्याच्या धोरणात्मक निर्णय व आर्किटेक्ट नेमणुकीबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता धुळे मनपा अंतर्गत धुळे शहरातील विविध मुख्य चौकांचे सुशोभिकरण करणेबाबत मा. श्री. अनुप अग्रवाल यांनी सुचित केले होते. त्यानुसार उक्त कामाचे अंदाजपत्रक, संकल्पचित्र, नकाशे व इतर विभागाचे नाहरकत इ. करीता आर्किटेक्ट नियुक्ती करणे आवश्यक आहे. तसेच धुळे शहरातील मुख्य चौकांचे सुशोभिकरण करण्यास प्रायोगिक तत्वावर संस्था, संघटनाव इतर विभाग तयार असल्यास मान्यता देणेकामी निर्णयास्तव सदरचा विषय मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक वरील जे दोन विषय होते त्यातही आर्किटेक्ट लागणार आहे. आपल्याकडे आर्किटेक्ट पॅनल आहे का.

मा.उपअभियंता हो आपल्याकडे ५ ते ६ आर्किटेक्ट आहेत.

मा.आयुक्त तथा प्रशासक त्यात त्यांना स्पेशॅलिटीनुसार काम देता की रोटेशननुसार काम देता.

मा.उपअभियंता स्पेशॅलिटी व अनुभवानुसार कामे देतो.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात प्रत्येक कामासोबत आर्किटेक्ट कोण असतील ते देखील नमुद करावे. IRC चे नॉर्म फॉलो करावे. शासनाने जेव्हा माझी वसुंधरा स्वच्छ सर्वेक्षण मध्ये इनिशिएटीव्ह घेतला होता. त्यात एक GR आला आहे की, खाजगी व्यक्ती, CSR, मोठे डोनर जे असतात. काही लोकांची इच्छा असते की, तयांच्या भागात आठवणींचा चौक व्हावा असे बऱ्याच शहरात झाले आहे. तो GR घेवुन एक जाहिरात प्रसिध्द करा. मनपाची की मनपा क्षेत्रात कोणी मोठा उद्योजक, कोणी CSR मधुन, किंवा एखादा डोनर घरच्यांच्या प्रित्यर्थ जर चौक सुशोभिकरण करु इच्छित असेल. यात चौक, रोड डिव्हायडर, रस्त्यांच्या किनाऱ्यांच्या मोकळया जागा तसेच कुठलीही ओपनस्पेस त्यांनी एक विशिष्ट नमुना घालुन द्या. त्या नमुन्यात अर्ज करावा. आपण त्यांनाही परवानगी देवु. त्यात अटी शर्ती अशा घालुन द्यावी की डिझाईन त्यांनी सबमिट करायचे. त्यांना नाव लागवणबाबत हक्क दिला जाईल. तसेच ते डिझाईन मनपाकडुन अॅप्रुव्ह केले जाईल. देखभाल दुरुस्ती कालावधी घालुन द्यावा. तसेच आपल्या मार्फतही प्रयत्न् चालु ठेवु. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २१२ दिनांक १९/११/२०२५**

धुळे महानगरपालिका अंतर्गत धुळे शहरातील विविध मुख्य चौकांचे सुशोभिकरण करणेच्या कामाबाबत सन्मानीय आमदार श्री अनुप भैय्या अग्रवाल, यांनी सुचित केले आहे.त्यानुसार उक्त कामाचे अंदाजपत्रक, संकल्प चित्र. नकाशे, इतर विभागाचे ना हरकत इ. करिता आर्किटेक नियुक्तों करणे आवश्यक आहे. तसेच धुळे शहरातील मुख्य चौकांचे सुशोभिकरण करण्यास प्रायोजित तत्वावर संस्था, संघटना व इतर विभाग तयार असल्यास त्यास मान्यता देणे कामी सदरचा निर्णय हा धोरणात्मक असल्याने सदरचा विषय मे महासभेपुढे मंजुरी साठी सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, धुळे मनपा अंतर्गत धुळे शहरातील विविध मुख्य चौकांचे सुशोभिकरण करणेस व याकामी शासकीय दरसुचीनुसार श्री आनंद खैरनार आर्किटेक्ट यांची नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच शहरातील संस्था, ट्रस्ट, व्यक्ती इ. मार्फत लोकसहभागातून स्वखर्चाने चौक सुशोभिकरण करण्यासाठी अटी शर्तीसह रितसर जाहिरात प्रसिध्दी करुन अर्ज मागविण्यात यावेत संबंधित संस्थेकडून चौक

सुशोभिकरण कामाचे संकल्पित आराखडे घेण्यात यावे. व मनपाच्या विहीत अटी शर्तीवर परवानगी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच चौक सुशोभिकरण करतांना शहर वाहतुक विभाग व पोलिस विभाग यांचेकडून आवश्यक ती परवानगी तथा नाहरकत दाखला घेणे बाबत कार्यवाही करावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-२१३ धुळे महानगरपालिकेचे उत्पन्न वाढीच्या दृष्टीने धुळे शहरात मनपा मार्फत महानगरपालिका मालकीच्या जागेवर Consumer पेट्रोल पंप उभारणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक आता एका पेट्रोल पंपासाठी मान्यता मिळाली आहे. त्याचे लोकेशन कुठे आहे.

मा.कार्य.अभियंता मनपाशाळा नं. १४ साक्रीरोड

मा.आयुक्त तथा प्रशासक मा.जिल्हाधिकारी कार्यालयाची परवानगी आली का. BPCL ला नियुक्ती केली का.

मा.कार्य. अभियंता हो परवानगी मिळाली आहे. तसेच BPCL कंपनीला नियुक्त केले आहे. त्यांना कळविले आहे पुढील तयारीसाठी.

मा.आयुक्त तथा प्रशासक ऑफिशिअली ऑनपेपर कळवावे व मुदत घालुन द्यावी. याचे लोकेशन कुठे असेल.

मा.उपअभियंता याचे लोकशन वरखेडी रोड कचरा डेपो येथे आहे. मनपा मालकीच्या गाडया असतात त्यांना रिफील करु शकतो. त्यातुन १५ ते १७ रुपये फायदा होणार आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक तेथील यंत्रणा पारदर्शक हवी. तसेच सीसीटीव्ही कॅमेरे बसवावे. तसेच मोबाईल डॅशबोर्ड घेण्याचा प्रयत्न करावा. हा जो कन्झुमर पेट्रोल पंप उभारतोय, मनपासुध्दा वेगवेगळया रेट कॉन्ट्रक्टरशी रेट कॉन्ट्रक्ट करतोय जसे सॉलीड वेस्ट मॅनेजमेंटची वर्क ऑर्डर करणार आहे. त्याची वाहने असतील ती सुध्दा फिलींग करता येतील. कन्झुमर पेट्रोल पंप स्वत:च्या वाहनांना माफक दरात पेट्रोल देतो. BPCL ने जे अॅप्रुव्ह केले त्यात स्टाफ कोणाचा राहिल.

मा.कार्य. अभियंता अजुन याबाबत ठरले नाही.

मा. आयुक्त तथा प्रशासक किती मॅनपॉवर लागेल यासाठी निविदा पध्दतीने करावी लागेल. यात जे फायदेशीर असेल व ज्यात कमी रिस्क असेल त्या ऑप्शनला निवडावे. तसेच जे मानधनावरील वाहने असतील त्यांना सुध्दा यामध्ये गृहीत धरावे. मात्र त्यांना कमर्शिअल दराने इंधन द्यावे आणि त्यांचे जे देयके तयार होतील, त्यांची वसुली वजा करुन पुढे फॉरवर्ड करावे. जेणेकरुन मनपाला अप्रत्यक्षपणे पैसे वसुल झाल्यासारखे होईल. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २१३ दिनांक १९/११/२०२५**

धुळे महानगरपालिकेचे उत्पन्न वाढीच्या दृष्टीने धुळे शहरात मनपा मार्फत महानगरपालिका मालकीच्या जागेवर Consumer पेट्रोल पंप उभारणे बाबत मा.आमदार श्री.अनुप (भैय्या) ओमप्रकाश अग्रवाल यांनी उपरोक्त संदर्भानुसार मागणी केली आहे.

उक्त बाबत सदर Consumer पेट्रोल पंप उभारल्यास महानगरपालिका मालकीच्या वाहनांना इंधन पुरवठा करणे सोयीचे होणार असून मनपाचे आर्थिक उत्पन्नात देखील वाढ होणार आहे.सदर Consumer पेट्रोल पंपसाठी वरखेडी रोड येथील अस्तित्वातील कचरा डेपो येथे जागा उपलब्ध करता येईल. तसेच शहरातील प्रमुख रस्त्यांवरील मनपा मालकीच्या इतर

जागेंचा सर्व्हे करून जागेबाबतचा अंतिम निर्णय घेता येईल. तरी या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सदरचा विषय मे.महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, धुळे महानगरपालिकेचे उत्पन्न वाढीच्या दृष्टीने धुळे शहरात मनपा मार्फत महानगरपालिका मालकीच्या जागेवर वरखेडी रोड येथील कंपोस्ट डेपो येथे उपलब्ध जागेत Consumer पेट्रोल पंप उभारणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच मनपामार्फत यापुर्वी प्रस्तावित असलेल्या बिपीसीएल पेट्रोल पंपासाठी मनुष्यबळाची व्यवस्था तसेच सदर ठिकाणी सि.सि.टी.व्ही. यंत्रणा, डॅशबोर्ड, इत्यादी बाबींबाबत कार्यवाही करावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-२१४ धुळे महानगरपालिकेच्या मालकीच्या पाचकंदील भागांतील चारही मार्केटचे पुर्नविकास करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता धुळे मनपा मालकीचे लाल बहादुर शास्त्री भाजी मार्केट, फळमार्केट, शिवाजी मार्केट, शंकर मार्केट असे एकुण ४ मार्केट रिडेव्हलप करायचे आहे. यापुर्वी आपला ठराव झाला होता, नविन बांधकाम करणेबाबत. परंतु नागरीक व दुकानदार तयार नसल्यामुळे रिडेव्हलप करणेसाठी सदरचा विषय मे. महासभेपुढे सादर झालेला आहे. यात श्री. आनंद खैरनार आर्किटेक्ट आहे. त्यांची नियुक्ती करतोय.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात कशासाठी मान्यता हवी आहे.

मा.उपअभियंता यासाठी आपल्या G+ फर्स्ट फलोअरसाठी मान्यता घ्यावी लागेल.तसेच कन्स्लटंट नियुक्ती व डिमॉलिशनसाठी मान्यता हवी आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात कॉस्ट इफेक्टीव्ह प्लॅन तयार करावा त्यात पार्किंगसाठी पुरेशी व्यवस्था असावी. जागेवर जेवढे व्यापारी आहेत त्यांचे समायोजन हे पहावे. व बाजार विभागाशी बोलुन घ्यावे. आरक्षणाची जी टक्केवारी आहे त्यात किती लोक बसतात व जे बसत नसतील त्यात वाढीव गाळे घेता येतात का हे पहावे. तसेच सर्व विभागांना एक सुचना आहे की, मनपाची कुठलीही इमारत बांधतांना कोणत्याही फंडातुन असेल त्यात नगररचनेची परवानगी घेतल्याशिवाय बांधु नये. मनपाच्या सर्व इमारती नियमात असाव्यात. अजुन कुठले मार्केट रिडेव्हलपमेंट करणे गरजेचे आहे का.

मा. उपअभियंता आता सध्या नवरंग पाण्याच्या टाकी व दसेरा मैदान येथे मार्केट आहे. त्यांचे टेंडरदेखील झाले आहे. तसेच पाचकंदील येथील चारही मार्केट चे पुर्नविकास करणेसाठी अस्तित्वातील जुन्या मार्केटचे बांधकाम निष्कासित करावे लागेल. त्यासही मान्यता मिळणेस विनंती आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २१४ दिनांक १९/११/२०२५**

धुळे महानगरपालिकेचे खालीलप्रमाणे चार व्यापारी संकुल सन १९२५ मध्ये बांधलेली आहेत.

| अ.क्र. | सि.स.नं. | मार्केटचे नाव | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| १) | ३०४९/३०५० | लालबहादूर शास्त्री मार्केट भाजी मार्केट | १४५७.२५ चौ.मी |
| २) | ३०५२ | फळ मार्केट | ९५२.३० चौ.मी |
| ३) | ३०५१ | शिवाजी मार्केट (कापड दुकान) | १२५६.७० चौ.मी |

| | | | |
|---|---|---|---|
| ४) | २९१३ | संकर मार्केट (कापड मार्केट/धान्य मार्केट) | १४४५.७० चौ.मी |
| | | एकूण | ५१११.९५ चौ.मी |

सदरच्या मार्केट मध्ये सध्यस्थितीत खालीलप्रमाणे भाडेकरू भाडेपट्ट्यावर आहेत.

| **अ.क्र.** | **मार्केटचे नाव** | **सध्यस्थितीतील भाडेकरू** | |
|---|---|---|---|
| | | ओटे | दुकाने |
| १) | लालबहादूर शास्त्री मार्केट भाजी मार्केट | ७५ | ३९ |
| २) | फळ मार्केट | ०७ | ३४ |
| ३) | शिवाजी मार्केट (कापड दुकान) | ३६ | ८१ |
| ४) | शंकर मार्केट (कापड मार्केट/धान्य मार्केट) | ३६ | ८१ |
| | एकूण | १५४ | २३५ |

यााबाबत यापुर्वी मनपाशी करार केलेल्या व्यापा-यांचे करार संपलेले आहेत. याबाबत संबंधीत काही व्यापा-यांनी मनपाची कोणतीही पूर्व परवानगी न घेता परस्पर गाळ्यांचे हस्तांतरण केले आहे,यामुळे कराराचा भंग झालेला आहे

उक्त बाबत पाचकंदील येथील चारही मार्केटचे पुनर्विकास करणे बाबत मा.आमदार श्री.अनुप (भैय्या) ओमप्रकाश अग्रवाल यांनी मागणी केली आहे. त्यानुसार पाचकंदील येथील चारही मार्केटचे पुनर्विकास करणेचा विषय धोरणात्मक असल्याने सदरचा विषय धोरणात्मक निर्णयासाठी मे.महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त प्रस्ताव व कार्यालयीन अहवालानुसार, धुळे महानगरपालिकेच्या मालकीच्या पाचकंदील भागांतील चारही मार्केटचे पुनर्विकास करणेच्या कामास मान्यता देणेत येत आहे. यात लोअर ग्राउंड, अप्पर ग्राउंड , पहिला मजला, पार्कींग याचा समावेश आहे. तसेच याकामी शासकीय दरसुचीनुसार श्री आनंद खैरनार आर्किटेक्ट यांची नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच पाचकंदील येथील चारही मार्केट चे पुर्नविकास करणेसाठी अस्तित्वातील जुन्या मार्केटचे बांधकाम निष्कासित करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच भविष्यात महापालिकेतील कोणतीही इमारत बांधकाम करतांना नगररचना विभागाची मान्यता तथा परवानगी आवश्यक असेल. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-२१५ — धुळे मनपा मालकीचे नवीन बांधकाम होणाऱ्या संकुलातील मुख्य भाडेपट्टेधारकांस प्राधान्य देणेबाबत आलेल्या कायालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.सहा.आयुक्त — धुळे मनपा मालकीचे पाचकंदिल येथे ४ मार्केट आहे. त्यापैकी लालबहादुर शास्त्री मार्केट नविन बांधण्याचे प्रस्तावित आहे. तेथील जे भोगवटादार आहे ते मयत झाले असल्याची शक्यता आहे. ते मार्केट ८० ते ९० वर्षापुर्वीचे आहे. त्यांच्या जागी त्यांच्या वारसांना यापुढे जे काही त्यांना लागु असलेले अटी शर्ती किंवा करारनामा त्यास कायदेशीर वारस म्हणुन मान्यता घेणे तसेच तेथे जे गाळे बांधकाम होईल या लोकांना पहिले प्राधान्य देणे आवश्यक आहे. निविदा जर काढली तर त्यात दर वाढतील व आपल्याला थकित रक्कम सुध्दा वसुल करावी

लागणार या लोकांकडुन म्हणुन त्यांना श्युओरिटी म्हणुन निविदा न काढता लॉटरी पध्दतीने असे दोन विषय मंजुरीसाठी मे. महासभेपुढे ७९ क प्रमाणे सादर करण्यात आले आहे.

मा. मु.ले.परीक्षक भोगवटाधारकांना अगोदरची मनपास देय असलेली रक्कम भरणेसाठी मुदत द्यावी लागेल तरच त्यांचा हक्क राहिल.

मा.आयुक्त तथा प्रशासक या विषयात २ पार्ट आहे. मुख्य भाडेपटटाधारकांला प्राधान्य आणि ज्या केसमध्ये भाडेपटटाधारकाची डेथ झाली असेल तर त्यांच्या वारसाला प्राधान्य देणे. यात २ सुचना अशा की, जी शासनाने समिती निश्चीत केली मुल्य निश्चीती समिती त्या समितीने जे मुल्य निश्चीत केले असेल ते दर त्यांना लागु होतील त्यापेक्षा कमी दराने त्यांना देता येणार नाही. आपण जे दर सुधारीत करतोय त्यासाठी मुदत घालुन द्यावी लागेल. त्या मुदतीत जे लोक पैशाचा भरणा करतील ते यासाठी पात्र राहतील. नाहीतर त्यांना अपात्र समजण्यात येईल. तसेच शासनाने निश्चीत केलेली कालमर्यादा आहे. त्यामुळे त्याचे अॅग्रीमेंट केले नाही पाहिजे.तसेच डिपॉझिट चार्जेस असतील ते देखील त्यांच्याकडुन भरुन घ्यावे. ज्या मार्केट बिल्डींग चे लाईफ संपले ते रिडेव्हलप होतील त्या सर्व मार्केटसाठी लागु राहिल. बांधकाम विभागाने दक्षता घ्यावी. कर्मशिअल कॉम्प्लेक्स बांधतांना अतिरीक्त गाळे निर्मीती कशी होईल व त्यातुन वाढीव उत्पन्न कसे होईल हे देखील पहावे.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २१५ दिनांक १९/११/२०२५**

धुळे मनपा मालकीचे दुकाने / ओटे / कोठे / खोली / जागा इ. १६४०/- इतके संख्या असुन त्यापैकी सद्यस्थितीत पाचकंदिल मार्केट, सावता माळी मार्केट जीर्ण झालेले असुन त्याठिकाणी नवीन बांधकाम प्रस्तावित आहे तसेच दसेरा मैदान व नवरंग पाण्याची टाकी येथे नवीन मार्केट प्रस्तावित आहे.

पाचकंदिल परिसर मार्केट, सावता माळी मार्केट व ईतर संकुलातील मार्केट यांना धुळे मनपाने अनेक वर्षापुर्वी गाळे भोगवटयाने दिलेले असुन त्यांची मुदत संपलेली आहे. सदर संकुलातील बरेच मुळ मालक मयत झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी त्यांचे जागी कायद्याने जे वारस असतील त्यांना मुळ मालकास लागु होणा-या सुविधा लागु असणेबाबत किंवा त्या जागी गृहित धरणे/ वारस घेणेस तसेच भविष्यामध्ये ज्या व्यापारी संकुलांचे बांधकाम होणार आहे त्याठिकाणी जे सद्यस्थितीत व्यवसाय करत असतील किंवा ज्यांचे नावे भाडेपट्टा असेल अशा भाडेपट्टाधारकास सोडत/लॉटरी पध्दतीने गाळे, दुकान, ओटा, खोली देणेबाबत म.न.पा. अधिनियम ७९ नुसार निर्णय घेणेकामी सदरचा विषय मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, धुळे महानगरपालिका मालकीचे पाचकंदील परिसरातील ४ ही व्यापारी संकुले, संत सावता माळी व्यापारी संकुल येथील मार्केट अंदाजे ६० ते ७० वर्षापुर्वीचे जुने आहे त्याठिकाणी पाडुन नवीन बांधकामे प्रस्तावित आहेत. नवीन बांधकाम केल्यानंतर सद्यस्थितीत महानगरपालिका अभिलेखावर नोंद असणारे भोगवटादार यांना प्रथम प्राधान्याने द्यावयाचे आहे यातील काही भोगवटादार हे मयत झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी त्यांचे जागी त्यांचे कायदेशीर वारसास देखील मुळ भोगवटादार यांना लागु होणाऱ्या सर्व सुविधा व अटी शर्ती लागु करणेस मान्यता देणेत येत आहे.

उक्त ठिकाणी नवीन बांधकामे झाल्यानंतर त्या ठिकाणी सध्या असणारे भोगवटादार यांनी सर्व थकीत रक्कम भरुन मनपाचे व शासनाचे अटी शर्तीचे पालन केल्यास निविदा न काढता सोडत/ लॉटरी पध्दतीने गाळे, ओटे, कोठे, जागा, खोली देणेबाबत आरक्षण नुसार प्रथम प्राधान्य देण्यांत यावे त्यानंतर उर्वरित करिता महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्ता भाडेपट्टा नुतनीकरण) नियम २०२३ व त्यामधील मार्गदर्शक सुचना नुसार कार्यवाही करणेस तसेच भविष्यांत म.न.पा. मालकीचे ईतर व्यापारी संकुलांचे देखील जुने पाडुन नवीन

बांधकाम होणार असेल त्याठिकाणी देखील त्याचप्रमाणे कार्यवाही करणेस महासभा मंजुरी देत आहे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-२१६ मनपा मालकीच्या पाचकंदील परीसरातील ४ व्यापारी संकुल व सावता माळी मार्केट ८० फुटी रोड येथील भाडेपट्टेधारकांचे भाडे दर सुधारीत करणे व यापूर्वी केलेल्या ठराव नं २२२ दिनांक ११/०२/२०१६ नुसार दुप्पट आकारणी दरामध्ये सुधारणा करणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. सहा. आयुक्त धुळे मनपा मालकीचे पाचकंदिल मार्केट व सावता माळी मार्केट आहे. तेथील भोगवटा धारकांचे अंदाजे ३२ कोटी रुपये थकित आहे. सन २०१५-१६ च्या दरम्यान यांची मुदत संपली होती. मे. महासभेने ठराव क्र. २२२ नुसार रेडीरेकनर दराची आकारणी केली आणि मुदत संपुन ताब्यात न दिल्यामुळे दुप्पट आकरणी करायची आहे. त्यामुळे त्या रक्कमा मोठया प्रमाणात वाढल्या आहेत. समजा त्या लोकांनी त्या रकमा नाही भरल्यामुळे ती रक्कम बुडणारी आहे. यात ते बांधणे ही गरजेचे आहे. तसेच थकबाकी वसुल ही होणे गरजेचे आहे. नाही भरली तर शास्ती व बाकीच्या गोष्टी वाढता आहेत. यात मनपाच्या अडचणी वाढतील व भोगवटाधारकांच्या अडचणी वाढतील चालु वर्षाचा रेडीरेकनर दराप्रमाणे आकारणी करण्यासाठी हा विषय मे. महासभेपुढे सादर केला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात शासनाने निश्चीत केलेल्या धोरणाप्रमाणे दर राहतील. शासनाच्या धोरणाप्रमाणे मनपाचे नुकसान होणार नाही.यात १५ डिसेंबर मुदतवाढ आपण देत आहोत. तसेच अभय योजनेची मुदत १५ डिसेंबर राहिल. तसेच १५ डिसेंबरपर्यंत भरणा केला नाहीतर दंडाची प्रोव्हीजन करावी. जेथे मालक नसेल तर तेथे काहीतरी मार्ग काढुन भरणा करुन घ्यावा लागेल. किमान वारसांच्या भरले तरी चालणार आहे. याचे बिल लवकर जनरेट करावे. डिमांड नोट रिव्हाईज लवकर द्यावे. यानंतर कुठले मार्केट रिडेव्हलप होत आहे का ज्याचे दर सुधारीत करणे गरजेचे आहे.

मा.सहा.आयुक्त पाच कंदील व सावता माळी मार्केट परिसरातील व्यापारी संकुले जुने पाडून नविन बांधकाम होणार आहे. मनपा आर्थिक हिताच्या दृष्टीने धुळे महानगरपालिका मालकीच्या पाचकंदील परीसरातील चार (१, २, ३, ४) ही व्यापारी संकुलातील व संत सावता माळी मार्केट येथील भाडेपट्टेधारकांना ठराव क्रमांक २२२ दिनांक ११/०२/२०१६ अन्वये दुपप्पट भाडे आकारणीनुसार थकीत भाडे रक्कम वसुलीसाठी २० % सुट देण्याची अभय योजना लागू करणेबाबत ठराव क्रमांक २०२ दि. १७/१०/२०२५ अन्वये मान्यता देण्यात आलेली होती. उक्त फक्त पाच कंदील परिसरातील चारही संकुले व सावता माळी व्यापारी संकुलातील भाडेपट्टेधारकांना मनपा ठराव क्रमांक २२२ दिनांक ११/०२/२०१६ नुसार केलेल्या रेडीरेकनर दर दुप्पट ऐवजी नगररचना विभागाने दिलेल्या चालू वर्षाच्या (सन२०२५-२६) रेडीरेकनर दरानुसार एक पट भाडे आकारणी (नियमानुसार इतर कर वेगळे) करुन विवक्षीत प्रकरणी अभय योजना लागू करणेस उक्त प्रस्तावातील नमूद अ.क्र.१ ते ८ अटी शर्तीनुसार मान्यता देणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक प्रस्ताव मान्य. यानंतर एखादे मार्केट रिडेव्हलपमेंट निघत असेल त्याबाबतीत हा निर्णय लागु राहिल. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २१६ दिनांक १९/११/२०२५**

धुळे महानगरपालिका मालकीचे पाचकंदिल परिसरातील ४ मार्केट व संत सावता माळी मार्केट या ठिकाणी असलेले व्यापारी संकुले व त्यातील दुकाने, जागा, ओटे, कोठे, खोली धुळे म.न.पा.ने (तत्कालीन नगरपालिकेने) म.न.पा. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ नुसार वेळोवेळी मनपा ठरावाने भाडेपट्टयाने दिली होती त्यातील पाचकंदिल येथील संकुलातील भाडेपट्टेधारकांची मुदत सन २०१० पासुन २०१५-१६ चे दरम्यान संपलेली आहे तसेच नपा ठराव क्र. ३८ दि. १३-४-१९९२ अन्वये संत सावता माळी व्यापारी संकुलातील भाडेपट्टाधारकांना ३० वर्ष मुदतीकरीता देण्यांत आली होती त्या भाडेपट्टाधारकांची मुदत दि. १२-४-२०२२ रोजी संपलेली आहे यांना मनपा ठराव क्र. २२२ दि. ११-२-२०१६ नुसार आकारणी करून मागणी देयके देण्यांत आली आहे.

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षापासुन ठराव क्र. २२२ दि. ११-२-२०१६ नुसार मुदत संपलेल्या भाडेपट्टाधारकांना रेडिरेकनर दराची आकारणी करून दरवर्षी मागणी देयके देण्यांत येत आहे. वाचा क्र. २ नुसार प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार = एकुण थकीत रक्कम ४२ कोटी + शास्ती = ८ कोटी आज दिनांक १८/११/२०२५ रोजी सरासरी रक्कम ५० कोटी पर्यंत थकीत आहे.

यासंदर्भात सदर थकबाकी वसुल व्हावी यासाठी म. आयुक्त सो. यांचे अधिनियमातील तरतुदीनुसार स्वेच्छा अधिकाराने दि ३० नोव्हेंबर २०२५ अखेर १०० % शास्ती माफी योजना सुरू आहे तसेच प्रशासक ठराव क्र. २०२ दि. १७-१०-२०२५नुसार थकीत भाडे रकमेवर २० % सुट देणे अभय योजनेस दि. ३० नोव्हेंबर २०२५ अखेर सुरू आहे दोन्ही योजनांना देखील अल्प प्रतिसाद मिळत आहे.

थकीत रकमा वसुल करतांना अडचणी निर्माण होत असुन त्या खालीलप्रमाणे आहेत.:-

**a**. ठराविक मोजकेच गाळेधारकांनी काही प्रमाणांत थकीत रक्कम भरलेली आहे. पाचकंदिल परिसरातील काही गाळेधारकांनी वाढीव भाडेदराबाबत मे. धुळे जिल्हा न्यायालयात दावा दाखल केला होता त्याचा निकाल म.न.पा. धुळेच्या लाभात झालेला आहे त्याबाबत मे. संभाजी नगर न्यायालयात निकाल प्रलंबीत आहे. पाचकंदिल परिसर व ईतरही भाडेपट्टाधारक वारंवार मे. न्यायालयात दावे दाखल करतात.

**b.** रेडिरेकनर दर भाडेदराची प्रथमत: आकारणी केल्याने रकमेत झालेली वाढ भाडेपट्टेधारक मान्य करत नाही व भरणा करीत नाही तसेच शासनाचे वरिष्ठ कार्यालयाकडे अर्ज / तक्रार करतात.

**c.** दि. २४-२-२०१८ रोजी महानगरपालिकडुन डायरेक्टर जनरल ऑफ सेंट्रल एक्साईज इंटिलिजेंस, नाशिक यांनी मागणी केल्याप्रमाणे सन २०१२-१३ पासुन थकीत सेवाकराची वसुल गाळे भाडे रकमेपोटी दंड व्याजासह रक्कम ७६, ८८,२९१/- व एकुण व ईतर विभागांची मिळुन रु. १,०७,४४,९१८/- शासनाकडे जमा करण्यात आले आहे. सदर रक्कम भाडेपट्टेधारकांचे मागणी बिलात वसुली करिता समाविष्ट केली आहे.

**d.** दि. १ जुलै २०१७ पासुन शासन आदेशानुसार सेवाकर ऐवजी वसुल भाडे रकमेवर १८ % GST मिळुन मागणी बिले देण्यांत आली.

**e.** भाडेपट्टेधारकाने देय तारखेस भाडे जमा न केल्याने नियमानुसार शास्ती लावण्यांत आली आहे.

**f.** विषयांकित भाडेपट्टेधारकांचे गाळे मुदत संपली मात्र महानगरपालिकेच्या ताब्यात न दिल्याने मनपा ठराव क्र.२२२ नुसार (दुपटीने) आकारणी केल्याने मोठया प्रमाणांत भाडे भरणे भाडेपट्टाधारकांना शक्य होत नाही.

थकीत भाडे रकमा शासन मार्गदर्शक सुचनानुसार दुप्पट भाडे ऐवजी एकपट (Single) प्रमाणे भाडे रेडिरेकनर दराप्रमाणे आकारणी केल्यांस संपुर्ण रक्कम भरणेची भाडेपट्टाधारकांनी पत्राद्वारे वेळोवेळी तयारी दर्शविली आहे. महानगरपालिका ठराव क्र. २२२ दि. ११-२-२०१६ मध्ये सुधारणा करावयाची असेल तर किंवा सुट द्यावयाची असेल तर महानगरपालिकेतील मालमत्तेचा विनियोग संदर्भात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७९ नुसार मे. महासभेस अधिकार आहे तसेच महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्तेचे भाडेपट्टेद्वारे हस्तांतरण आणि भाडेपट्टेचे नुतनीकरण) नियम २०२३ च्या प्रभावी अंमलबजावणीकरीता दिनांक ०७/११/२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार शासनाने अतिरीक्त मार्गदर्शक सुचना निर्गमीत केलेल्या आहेत. त्यातील सुचना क्र. (९) मध्ये महानगरपालिकेने भाडेपट्टा थकबाकी वसुलीसाठी अभय योजना हाती घेण्या संदर्भात परीस्थितीनुरुप महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या/ प्रशासकाच्या मान्यतेने संबंधित महानगरपालिकेच्या आयुक्तांनी निर्णय घ्यावा असे नमूद आहे. त्यानुसार महानगरपालिका आर्थिक हिताचे दृष्टीने म.न.पा. ठराव क्र. २२२ दि. ११-२-२०१६ नुसार चे ठरावामध्ये सुधारणी करून दुप्पट ऐवजी एकपट (सिंगल) विषयांकित भाडेपट्टाधारकांना मुदत संपलेल्या तारखेपासुन चालु वर्षाचे सन २०२५-२६ या वर्षातील रेडिरेकनर दराप्रमाणे एकपट (Single) वाढ करून मागणी देयके दिल्यांस धुळे महानगरपालिकेस मोठ्या प्रमाणावर थकीत रकमेवर उत्पन्न मिळू शकेल. तसेच वरिलप्रमाणे सुट दिल्यांस महानगरपालिकेस खालील फायदे मिळतील.

**१.** उक्त ठिकाणी नवीन व्यापारी संकुल बांधकामे होणार असल्याने थकीत वसुली होऊन जागा मोकळी होईल.

**२.** भाडेपट्टेधारकांकडून भविष्यांत डिपॉझिट रक्कम प्राप्त होईल.

**३.** भाडेपट्टा हस्तांतर फी मिळेल. (भविष्यांत सुधारित करारनामा)

**४.** भविष्यांत GST कराच्या बाबत थकीत भाडे वरील रकमा भरणेबाबत अडचणी येणार नाही.

**५.** भाडेपट्टाधारकांचा महानगरपालिकेवरील विश्वास वाढुन महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल.

**६.** धुळे महानगरपालिकेचे न्यायालयीन वेळ, पैसा बचत होईल.

**७**. थकीत रकमा वसुल होणेस उक्त ठिकाणी प्रस्तावित नवीन बांधकाम होऊन जास्तीचे दुकाने बांधकामे होतील.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्तावानुसार, धुळे मनपा मालकीच्या गाळे, ओटे, कोटे, घरे, जागाभाडेपट्टाधारकांना मनपा ठराव क्र. २२२ दि. ११-२-२०१६ नुसार केलेल्या भाडे आकारणीत मागील थकीत रकमेवर चालु वर्षाचे सुधारित रेडिरेकनर दराप्रमाणे थकीत रक्कम वसुल करणे अभय योजना लागू करणे बाबतचा प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, धुळे मनपा मालकीच्या गाळे, ओटे, कोठे जागाभाडेपट्टाधारकांना मनपा ठराव क्र. २२२ दि. ११-२-२०१६ नुसार केलेल्या भाडे आकारणीत मागील थकीत रक्कम संबंधित गाळेधारकाने एकरकमी भरल्यास सदर विवक्षीत प्रकरणी **अभय योजनेस** खालील अटी शर्तीवर मान्यता देणेत येत आहे.

**१.** विषयांकित मनपा मालकीचे गाळे, ओटे, कोठे, जागा, भाडेपट्टेधारकांची मुदत संपलेली आहे व जी प्रकरणे न्यायालयात निकालासाठी प्रलंबीत आहेत अशा भाडेपट्टेधारकांनी न्यायालयीन केसेस मागे घेतलेनंतर थकीत भाडे भरणेकरीता या विवक्षीत अभय योजनेचा लाभ घेता येईल.

२. मुदत संपलेले भाडेपट्टेधारक मागील व चालु वर्षाचे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात सर्व रक्कम एकत्रीत मनपाकडे जमा करुन मागणी करतील त्यांची प्रकरणे पुढील निर्णयासाठी (स्थावर मालमत्तेचे भाडेपट्टयाद्वारे हस्तांतरण आणि भाडेपट्टयाचे नुतनीकरण) अधिनियम दिनांक ६ नोव्हेंबर २०२३ नुसार गठीत भाडे आणि सुरक्षा ठेव निर्धारण समितीपुढे सादर करणेत येईल.

**३.** विषयांकित व्यापारी संकुलातील भोगवटादारांना म.न.पा. ठराव क्र. २०२ दि. १७-१०-२०२५ नुसार थकीत भाडे रकमेवर २० % सुट देणे अभय योजनेचा लाभ मिळणार नाही.

**४.** विषयांकीत अभय योजने व्यतिरिक्त महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ८ कराधान नियम (५१) नुसार आयुक्तास असलेल्या आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार वेळोवेळी शास्ती माफी योजना भाडेपट्टाधारकास स्वतंत्रपणे लागू करतील.

**५.** सदरची विषयांकित विवक्षीत प्रकरणी अभय योजना **१५ डिसेंबर २०२५** या कालवधीपर्यंत लागू राहील. मात्र भविषयात मनपा हिताचे दृष्टीने मुदतवाढ म. आयुक्त, म.न.पा. धुळे हे भाडे हस्तांतरण नुतनीकरण नियम २०२३ मधील मार्गदर्शक सुचना क्र. ९ नुसार निर्णय घेईल.

**६.** काही भाडेपट्टेधारक यांनी पुर्ण रक्कम दि. १५ डिसेंबर २०२५ अखेर भरणे शक्य नाही त्यांना या तारखेपर्यत ५० % रक्कम व उर्वरित ५० % रक्कम १५ जानेवारी २०२६ पर्यत भरण्याची सवलत देण्यांत येत आहे. या तारखेपर्यत प्रलंबित रकमेचा भरणा न केल्यास महानगरपालिकेकडुन नवीन इमारतीतील जागा देणेबाबतचे हमीपत्र दिले जाणार नाही तसेच त्यापुढे कोणतीही सेवा सुविधा मनपाकडुन दिली जाणार नाही.

**७.** पाचकंदिल मार्केट परिसरातील ४ व्यापारी संकुलातील भाडेपट्टेधारकांसाठी चालु वर्षाचे (२५-२६) रेडिरेकनर दर रू. ३८६/- प्रती चौ.मी. प्रमाणे व सावता माळी मार्केट परिसरातील व्यापारी संकुला करिता रेडिरेकनर दर रू. १५८/- प्रमाणे आकारणी करावी.

**८.** या ठरावानुसार देण्यात आलेली सुट/कमी केलेले भाडे यास रकमेस भविष्यात शासन, मे. न्यायालय आदेश तसेच लेखापरीक्षणातील आक्षेप किंवा इतर कारणाने सदर ठराव रद्द झाल्यास किंवा योजना रद्द झाल्यांस किंवा सुट रकमेची भरपाई देणेस किंवा पुर्तता करुन देणे आवश्यक असल्यास संबंधित सुट घेणारे भाडेपट्टेधारक यांचेकडून त्याप्रमाणे वसुली करण्याचा अधिकार महानगरपालिकेस राहिल व तो निर्णय भाडेपट्टेधारक व त्यांचे वारसांवर सुध्दा बंधनकारक राहिल.

विषयांकीत पाच कंदील व सावता माळी मार्केट परिसरातील व्यापारी संकुले जुने पाडून नविन बांधकाम होणार आहे. मनपा आर्थिक हिताच्या दृष्टीने धुळे महानगरपालिका मालकीच्या पाचकंदील परीसरातील चार (१, २, ३, ४) ही व्यापारी संकुलातील व संत सावता माळी मार्केट येथील भाडेपट्टेधारकांना ठराव क्रमांक २२२ दिनांक ११/०२/२०१६ अन्वये दुपप्ट भाडे आकारणीनुसार थकीत भाडे रक्कम वसुलीसाठी २० % सुट देण्याची अभय योजना लागू करणेबाबत ठराव क्रमांक २०२ दि. १७/१०/२०२५ अन्वये मान्यता देण्यात आलेली होती. उक्त विषयांकीत फक्त पाच कंदील परिसरातील चारही संकुले व सावता माळी व्यापारी संकुलातील भाडेपट्टेधारकांना मनपा ठराव क्रमांक २२२ दिनांक ११/०२/२०१६ नुसार केलेल्या रेडीरेकनर दर दुप्पट ऐवजी नगररचना विभागाने दिलेल्या चालू वर्षाच्या (सन२०२५-२६) रेडीरेकनर दरानुसार एक पट भाडे आकारणी (नियमानुसार इतर कर वेगळे) करुन विवक्षीत प्रकरणी अभय योजना लागू करणेस उक्त प्रस्तावातील नमूद अ.क्र.१ ते ८ अटी शर्तीनुसार मान्यता देणेत येत आहे.

तसेच दि. ३१ मार्च २०२६ पर्यत जे व्यापारी संकुले पाडुन त्याठिकाणी नवीन बांधकामे होतील त्यातील भोगवटादारांसाठी देखील ही योजना लागु राहील यासही मान्यता देणेत येत आहे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-२१७ प्रारूप विकास योजना, धुळे (वाढीव हद्द), जि. धुळे याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८(४) नुसार निर्णय घेणे व कलम ३०(१) अन्वये प्रारूप विकास योजना शासनास मंजुरीस्तव सादर करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

प्र. सहा.संचालक न.र. धुळे शहराची वाढीव हददीची विकास योजना प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच प्रसिध्द प्रारुप विकास योजनेवर प्राप्त झालेल्या सुचना / हरकती अनुषंगाने नियोजन प्राधीकरणास अहवाल सादर करण्यासाठी उक्त अधिनियमाचे कलम २८(२) अन्वये समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदरच्या नियोजन समितीने सुचना व हरकतदारांना सुनावणी देवुन दि. १७/१०/२०२५ रोजी त्यांचा अहवाल सादर केला आहे. त्या अनुषंगाने प्रसिध्द प्रारुप विकास योजनेवर प्राप्त सुचना व हरकतींचा अनुषंगाने नियोजन समितीने सादर केलेल्या अहवालावर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २८ (४) नुसार निर्णय घेणे व कलम ३०(१) अन्वये प्रारुप विकास योजना शासनास मंजुरीस्तव सादर करण्यास मंजुरी देणेकामी सदरचा विषय मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात काय झाले अजुन बऱ्याच लोकांनी दरम्यानच्या काळात लेखी निवेदन दिले आहे. काहींचे लेआऊट सँक्शन वगैरे आहे. अशा निवेदनांचा देखील आपल्याला विचार करावा लागेल. त्यांचा विचार करुन त्याला अंतिम करुया. विविध विभागाकडेही काही प्रकरणे असेल की मधल्या काळात मा. न्यायालयाचे काही आदेश झाले असतील आरक्षणा विरुध्द किंवा आरक्षण कायम ठेवावे याबाबत विधी विभागाने तपासावे तेही कंसीडर केले जावे.

मा. प्र.सहा. संचालक (नर) ही जी वाढीव हददीची विकास योजना तयार झाली याबाबत केसेस वगैरे नाही. फक्त दरम्यानच्या कालवधीत विकास योजनेचे काम सुरु होते. आपल्या म्हणण्याप्रमाणे लेआऊट मंजुर केले अशा केसेस मध्ये सुध्दा प्लॅनिंग कमिटीने अहवाल सादर केला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक काही केसेस राहिल्या असतील तर आपण महासभेच्या माध्यमातुन त्या करु. तुमचे ELU चे ही काम चालु आहे.ते काम जलदगतीने होईल असे पहावे. काम मुदतीतच करावे. डीपी तयार करतांना बेस नकाशे तयार होतात ते कोणत्या फॉरमॅटमध्ये तयार होतात.

मा. प्र.सहा संचालक (नर) ऑटोकॅडमध्ये

मा.आयुक्त तथा प्रशासक इतर विभागाला जे प्लॅन तयार करायचे आहे. त्यांनी मुळ नकाशे सोबत ठेवावे. ते रुट प्लॅनिंग साठी सोपे जातील. वॉटर सप्लाय, ड्रेनेजसाठी कामात येतील. सदर प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक २१७ दिनांक १९/११/२०२५**

धुळे महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीतील क्षेत्राची प्रारूप विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ (१) मधील तरतूदीनुसार दि.१५/०५/२०२५ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. प्रसिध्द प्रारुप विकास योजनेवर प्राप्त झालेल्या सूचना व हरकतदारांना सुनावणी देऊन, नियोजन प्राधिकरणास अहवाल सादर करण्यासाठी, उक्त अधिनियमाच्या कलम २८ (२) अन्वये दि.१९/०६/२०२५ रोजी नियोजन समिती गठीत करण्यात आलेली आहे.

सदरच्या नियोजन समितीने सूचना व हरकतदारांना सुनावणी देऊन दि.१७/१०/२०२५ रोजी त्यांचा अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवाल सभेपुढे विचारार्थ ठेवण्यात आला.

नियोजन समितीने सादर केलेल्या अहवालाचे आजच्या सभेत अवलोकन केले असता, त्या अहवालातील काही बाबी वगळता उर्वरीत अहवाल सर्वसाधारण योग्य असल्याने मान्य करण्यात आला. अहवालातील ज्या अर्ज / बाबींविषयी सभेचे मत वेगळे आहे

त्याबाबतचा तक्ता नियोजन प्राधिकरणाचे निर्णयासह, सोबत "परिशिष्ठ अ" म्हणून जोडला आहे. तसेच, अहवाला व्यतिरिक्त खालील बदल सूचविण्यात आलेत.

१.मौजे नगाव गावातील गट क्र. ३०१/२+३ या मंजूर अंतिम अभिन्यासाचा वचनबद्ध विकास विचारात घेऊन मंजूर अभिन्यासाचे क्षेत्र शेती विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्यात यावे. तसेच, प्रारूप प्रसिद्ध वि. यो. नकाशामध्ये गट क्र. २९४ च्या ठिकाणी गट क्र. ३०१ व गट क्र. ३०१ च्या ठिकाणी गट क्र. २९४ दर्शविण्यात यावा

२. मौजे मोराणे येथील गट क्र. १२ व १३ च्या दक्षिणेस गट क्र. ६२ मध्ये दर्शविलेल्या रहिवास विभागा ऐवजी 'म्युनिसिपल पर्पज' हे आरक्षण नव्याने प्रस्तावित करण्यात यावे.

उपरोक्त अनुषंगाने "परिशिष्ट अ" तसेच वरील अ. क्र. १ व २ मधील बदलांना मान्यता देऊन कलम २६ (१) अन्वये प्रसिध्द प्रारूप विकास योजनेमध्ये झालेल्या बदलाबाबची सूची नागरीकांच्या अवलोकनार्थ अधिनियमाचे कलम २८(४) मधील तरतूदीनुसार प्रसिध्द करून, प्रारूप विकास योजना शासनास कलम ३० नुसार मंजूरीस्तव सादर करण्यासाठी तसेच नियोजन समितीने दि.१८/०८/२०२५ च्या पत्रान्वये अहवाल सादर करण्यास अपेक्षिलेल्या मुदतवाढीस मान्यता देण्यात येत आहे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

**मे. महासभेच्या बैठकी प्रसंगी मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी दिलेले निर्देश**

१. सायंकाळी कचरा संकलनासाठी पर्यायी व्यवस्था करण्यात यावी.

२. सकाळी ६ ते ८ सर्व कर्मचाऱ्यांमार्फत मुख्य रस्ते स्वच्छ करण्यात यावेत. तसेच कर्मचाऱ्यांना दैनंदिन कामाचे तास ठरवुन त्याप्रमाणे स्वच्छतेची कार्यवाही करावी.

३. सकाळी ६.१५ वाजता प्रत्येक स्वचछता निरीक्षकाने कर्मचाऱ्यांची हजेरी घेतांनाचा फोटो अपलोड करावा आणि तेवढयाच उपस्थित कर्मचाऱ्यांची हजेरी लावण्यात यावी.

४. विद्युत विभागाने संबंधित ठेकेदारास विद्युत दिवे दुरुस्तीचे उदिष्ठ ठरवुन देण्यात यावे. व दैनंदीन दुरस्तीबाबतचा अहवाल सादर करावा.

५. आस्थापना विभागाने अतिक्रमण विभागसाठी अतिरीक्त पथक नियुक्तीबाबत कार्यवाही करावी.

६. दिनांक २७ नोव्हेंबर पासून एस.आर.पी.एफ मैदानावर आयोजित कार्यक्रमासाठी फिरते शौचालय तसेच स्वच्छता पाणीपुरवठा इत्यादी बाबत संबंधित विभागाने कार्यवाही करावी.

७. मालमत्ता कराची आकारणी करणेबाबत आलेले मालमत्ता धारकांचे अर्ज संबंधित लिपीक तथा निरीक्षक यांच्याकडे प्रलंबित आहेत सदर अर्ज तातडीने स्थापत्य संस्थेकडे वर्ग करणेबाबत कार्यवाही करावी.

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**